# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.07.2025** **वार-शुक्रवार**

---

**परतवारी**

आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठ्ठलाचं दर्शन घेऊन संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्या परतीच्या प्रवासाला निघाल्या असून आज दोन्ही पालख्यांचा मुक्काम पुण्यात आहे, तुकराम महाराजांची पालखी उद्या पिंपरी चिंचवडमध्ये मुक्कामी असेल त्यानंतर हा पालखी सोहळा देहूकडे मार्गस्थ होईल, तर ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा रविवारी आळंदीकडे मार्गस्थ होणार आहे.

**नवलकिशोरराम**

पुणे महापालिकेच्या विकासकामांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी पाच लाख रुपयांच्या पुढील प्रत्येक विकासकामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. एकंदर कामांच्या दहा टक्के कामांची तपासणी दक्षता विभागामार्फत प्रत्यक्ष जागेवर जाऊन केली जाणार आहे. पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.

**pcmc**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुली मोहिमेअंतर्गत १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत ४ लाख २८ हजार मालमत्ताधारकांनी मिळून ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे. ३०

जूनपर्यंत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलत देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ ३ लाख २३ हजार २३९ मालमत्ताधारकांनी घेतला. १ जुलै ते ३० सप्टेंबर  या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना महापालिकेनं ४ टक्के सवलत जाहीर केली आहे.

**रोजगारमेळावा**

पुणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आणि खडकीच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयानं येत्या येत्या २२ जुलै रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयात 'पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचं आयोजन केलं आहे. इच्छुकांनी विभागाच्या rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत, असं आवाहन मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी सहायक आयुक्त सा. बा. मोहिते यांनी केलं आहे.

**सहकारभारती**

सहकार भारतीच्या पुणे जिल्हा साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुखपदी अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर इथल्या कृषिनाथ ग्रीन एनर्जी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब आव्हाळे यांची निवड झाली आहे. आळंदीमध्ये नुकत्याच झालेल्या दोन दिवसांच्या अभ्यासवर्गावेळी सहकार भारतीचे पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी पुणे जिल्ह्याची कार्यकारीणी घोषित केली.

**सरपंचपरिषद**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशननं 'राष्ट्रीय सरपंच संसदेच्या सहाय्यानं येत्या १९ आणि २० जुलैला 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदेचं आयोजन केलं आहे. आळंदीमध्ये होणाऱ्या या परिषदेत राज्यभरातून  ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. वारकरी संप्रदायाच्या प्रबोधन कार्याचा विस्तार करण्याच्या उद्देशानं या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>अण्णाभाऊसाठेपुण्यतिथी</u>**

ज्येष्ठ समाजसुधारक, लेखक, कवी अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्त पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात आज अभिवादन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून केलेली मांडणी लक्षात घेऊन आपणही समाजातील उपेक्षित लोकांच्या उद्धारासाठी काम केलं पाहिजे असं प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रविंद्र शिंगणापूरकर यांनी यावेळी केलं. यावेळी काही विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊंनी लिहिलेल्या "स्मशानातलं सोनं " या कथेचं अभिवाचन केलं. तर काहींनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा भाषणातून आढावा घेतला.

**<u>संशोधनभोंडेसर</u>**

डॉ डी वाय पाटील विद्यापीठातील रिजनरेटिव्ह मेडिसीन प्रयोगशाळेत गोमुत्रावर केलेलं संशोधन नुकतंच जर्नल ऑफ आयुर्वेद अँड इंटिग्रेटीव मेडिसीन या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध झालं आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ रमेश भोंडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे संशोधन केलं आहे. गोमुत्रामुळे मूळ पेशींची जोमानं वाढ होत असून, गुडघेदुखी आणि हाडांची झीज यावरही ते उपयुक्त असल्याचं या संशोधनातून समोर आलं आहे.

**<u>आंदोलन</u>**

सातव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेनं राज्यव्यापी आंदोलन सुरू केलं आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत अनिश्चित काळासाठी हा संप सुरू राहणार असल्याचं संघटनेनं सांगितलं आहे. ससून रुग्णालयातील अनेक परिचारिकाही संपावर गेल्यामुळे रुग्णसेवेवर परिणाम झाला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण होतं, कमाल तापमान २९ तर किमान तापमान २२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही ढगाळ हवामान असेल तसंच हलक्या पावसाचीही शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**